**नि.फौ.ख.क्र.१०६/२०२१**
आर.पी.एफ. पुणे -वि.- अजित पवार व ईतर
**निशाणी क्र.१ च्या पुढे**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – रॉडनी आर. दुराई (तक्रारदार)
वय – ५० वर्षे, व्यवसाय – प्रधान आरक्षक, रेसुब कर्ला,
रा.- बदलापुर, ठाणे.

**दोषारोपापुर्वी सरतपासणी सरकारी अभियोक्ता श्री.गौरव कुमार सिंग यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

दि. २२/०२/२०२१ रोजी मी रेसुब पुणे येथे प्रधान आरक्षक या पदावर कार्यरत होतो. मी त्यादिवशी १५.०० वाजेपासुन २३.०० वाजेपर्यंत रेल्वे स्टेशन परीसरात कर्तव्यावर होतो. माझे सोबत आरक्षक विनोद पानसरे हे होते. त्यादिवशी १७.३० वाजता एक व्यक्ती मालधक्क्याच्या गोडाऊन समोरुन काही सामान घेवुन संशयीतरित्या जात असल्याचे आम्हाला दिसले. आम्ही त्याला थांबवुन त्याची विचारपुस केली त्यावेळी त्याने त्याचे नाव अजित पवार असे सांगितले. त्याच्याकडे लोखंडी दोन प्लेट होत्या. त्याबाबत त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याच्याकडे कुठलाही परवाना नव्हता. त्याने आम्हाला सांगितले की, सदरचे प्लेट रेल्वे पटरीच्या जवळ पडलेल्या होत्या, तेथुन त्याने चोरी केलेल्या आहेत. या अगोदर देखील त्याने अशा प्रकारची चोरी केली असल्याचे आम्हाला सांगितले.

२. त्यानंतर आम्ही घटनेची सर्व माहिती उप.निरीक्षक महेश कवडे यांना दिली. ते लागलीच घटनास्थळी आले व त्यांनी पाहणी केली. त्यांनी दोन पंचाना बोलावुन घेतले व त्यांचे समक्ष आरोपीच्या ताब्यातील दोन लोखंडी प्लेट जप्त केल्या व पंचनामा तयार करुन आमच्या सहया घेतल्या. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, कवडे साहेबांची, पंचाची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २६** देण्यात येतो. त्यानंतर आम्ही आरोपीस रेसुब पुणे येथे घेवुन आलो. त्यानंतर मी माझी लेखी तक्रार कवडे साहेबांना दिली. आता मला सदरची तक्रार दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २७** देण्यात येतो. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास दोषारोपापर्यंत तहकुब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

दि. ०२/०७/२०२६
स्थळ - पुणे

(एन.जे.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

**नि.फौ.ख.क्र.१०६/२०२१**
आर.पी.एफ. पुणे -वि.- अजित पवार व ईतर
**निशाणी क्र.१ च्या पुढे**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – रॉडनी आर. दुराई (तक्रारदार)
वय – ५० वर्षे, व्यवसाय – प्रधान आरक्षक, रेसुब कर्ला,
रा.- बदलापुर, ठाणे.

**दोषारोपानंतर आरोपी क्र. १ तर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. ए.टी.नावडकर यांचेमार्फत सुरू-**

३. घटना दि. २२/०२/२०२१ रोजी घडली होती. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व्यतिरीक्त सदरील आरोपीला चोरीचे सामान घेवुन जात असताना कोणीही पाहिले नव्हते. माझी नेमणुक रेल्वे स्टेशन परीसरात तसेच आजुबाजूस करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला रेल्वेचे सामान घेवुन जात असताना आम्ही पाहिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी रेल्वेचे अधिकारी असतात. हे म्हणणे खरे नाही की, या आरोपीवर पुर्वीपासुन दुस-या केसेस दाखल असल्याने या प्रकरणात मी त्याच्याविरुध्द खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा या गुन्हयाशी कुठलाही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**दोषारोपानंतर आरोपी क्र. २ तर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. एस. एफ. घुगे यांचेमार्फत सुरू-**

४. हे म्हणणे खरे आहे की, माझे सोबत असलेले पानसरे यांना रेल्वेने बडतर्फ केलेले आहे. **नि.क्र. २६** वरील पंचाना मी ओळखत नाही. पंचाना कसे बोलवले होते हे मला माहिती नाही. पंचनामा नेमका कोणी व कधी लिहला हे मला माहिती नाही. मी इतर आरोपीला ओळखत नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

दि. ०२/०७/२०२६
स्थळ - पुणे

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.02 17:16:32 +0530

(एन.जे.चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.